पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे कार्यालय
पत्ता- चव्हाणनगर, पाषाण रोड, पुणे ४११००८
दुरध्वनी क्रमांक (०२०)२५६५७८७८
ई मेल आय.डी.- sp.pune.r@mahapolice.gov.in



प्रेस नोट १७/१०/२०२६

खेड तालुक्यातील वाडा येथील भांबुर्डेकर ज्वेलर्स दुकानात चोरी करणाऱ्या दोन आरोपींना अटक; त्यांच्याकडून १० गुन्हे उघडकीस आणून गुन्ह्यातील चोरीस गेलेला एकूण ६,००,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

स्थानिक गुन्हे शाखा व खेड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीणची कारवाई

दिनांक २२/०७/२०२६ रोजी खेड पोलीस स्टेशन हद्दीतील वाडा, भांबुर्डेकर ज्वेलर्स दुकानात चोरी झाली असून, खेड पोलीस स्टेशन गु.र.नं.४३७/२०२६, भारतीय न्याय संहिता (भा.न्या.सं.) कलम ३३१(४), ३०५(अ) प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक श्री. संदीप सिंह गिल्ल (सो.), पुणे ग्रामीण यांनी स्थानिक गुन्हे शाखा पथकास वाडा परिसरातील भांबुर्डेकर ज्वेलर्स दुकानात झालेल्या चोरीचा गुन्हा उघडकीस आणण्याकरिता सूचना दिल्या.

त्या अनुषंगाने सदर गुन्ह्यांचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेच्या वतीने चालू करण्यात आला. सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान भांबुर्डेकर ज्वेलर्स, वाडा परिसरातील सीसीटीव्ही (CCTV) फुटेज तपासण्यात आले, रेकॉर्डवरील आरोपींकडे तपास करण्यात आला तसेच गोपनीय बातमीदारांमार्फत बातमी मिळाली की, खेड पोलीस स्टेशन हद्दीत वाडा, ता. खेड, जि. पुणे येथील लक्ष्मी रोड, बँक ऑफ महाराष्ट्र शेजारील भांबुर्डेकर ज्वेलर्स दुकानात चोरी करणारे इसम खरपुडी गावाच्या हद्दीतून चोरी करण्याचे साहित्य घेऊन मोटारसायकलवरून जाणार आहेत.

अशी खात्रीशीर बातमीदारांमार्फत माहिती मिळाल्यामुळे स्थानिक गुन्हे शाखा, पुणे ग्रामीणचे पोलीस पथक खरपुडी गावाच्या हद्दीत भीमा नदीच्या कडेला पुलाजवळ सापळा लावून थांबले असताना, चार इसम त्यांच्या जवळील मोटारसायकलवरून पोत्यात काहीतरी घेऊन जाताना दिसले. त्यावेळी आरोपी नामे: **१)पवित्र विनोद ठाकूर, वय २० वर्ष २) उमेश विनोद ठाकूर, वय २२वर्ष दोघेही रा. पत्रावस्ती वाकी बुद्रुक, ता. खेड, जि. पुणे व दोन विधिसंघर्षग्रस्त बालक** यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडे चौकशी केली असता, त्यांनी वाडा येथील भांबुर्डेकर ज्वेलर्स दुकानाचे शटर पहार व कटरच्या सहाय्याने उचकटून दुकानातील सोन्या-चांदीच्या दागिन्यांची चोरी केल्याचे तसेच त्यांनी खेड, आंबेगाव, शिरूर तालुक्यांमध्ये विविध ठिकाणी घरफोडीचे गुन्हे केल्याची कबुली दिली आहे.

त्यांच्याकडून गुन्ह्यातील चोरी केलेली एकूण ३.२६७ किलो ग्रॅम वजनाची चांदी, ०५मोबाईल फोन, रोख रक्कम, तसेच गुन्हा करण्याकरिता वापरलेले लोखंडी कटर, पहार, पकड, स्क्रू ड्रायव्हर, हातोडा व दोन मोटारसायकल, असा एकूण ६,००,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल व गुन्हे करण्याकरिता वापरलेले साहित्य जप्त करण्यात आलेले आहे.

त्यांच्याकडे गुन्ह्याबाबत अधिक चौकशी केली असता त्यांनी खालीलप्रमाणे गुन्हे केल्याची कबुली दिली आहे:

१) खेड पोलीस स्टेशन गु.र.नं ४३७/२०२६ भा.न्या.सं. कलम ३३१(४), ३०५(अ)
२) खेड पोलीस स्टेशन गु.र.नं २०६/२०२६भा.न्या.सं.कलम ३०५(अ), ३१४(४),
३) खेड पोलीस स्टेशन गु.र.नं २३१/२०२६ भा.न्या.सं.कलम ३०५(अ), ३१४(४),
४) खेड पोलीस स्टेशन गु.र.नं २८३/२०२६, भा.न्या.सं.कलम ३३१(१),३३१(४),६२
५) घोडेगाव पोलीस स्टेशन गु.र.नं १४१/२०२६ भा.न्या.सं.कलम ३३१(१),३३१(४),३०५(अ)
६) घोडेगाव पोलीस स्टेशन गु.र.नं १९०/२०२६ भा.न्या.सं.कलम ३३१(१),३३१(४),३०५(अ)
७) घोडेगाव पोलीस स्टेशन गु.र.नं १५८/२०२५ भा.न्या.सं.कलम ३३१(१),३३१(४),३०५(अ)
८) घोडेगाव पोलीस स्टेशन गु.र.नं १५५/२०२५ भा.न्या.सं.कलम ३३१(१),३३१(४),३०५(अ)
९) शिक्रापूर पोलीस स्टेशन गु.र.नं ६५५/२०२६ भा.न्या.सं.कलम ३०९(६),३(५)
१०)शिक्रापूर पोलीस स्टेशन गु.र.नं ६९८/२०२६ भा.न्या.सं.कलम ३३४(१),३०५(अ)

सदर आरोपींना दिनांक १९/१०/२०२६ रोजीपर्यंत पोलीस कस्टडी रिमांड देण्यात आली आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्री.संदीप सिंह गिल्ल (सो.),पुणे ग्रामीण, अपर पोलीस अधीक्षक डॉ. शुभम कुमार, पुणे विभाग, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.अमोल मांडवे, खेड उपविभाग यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. प्रमोद क्षीरसागर, खेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. सुभाष चव्हाण, स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार, खेड पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक महेश गरड, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार शरद बांबळे, दीपक साबळे, संदीप फड, स्वप्नील गाढवे, हनुमंत ढोबळे, अक्षय नवले, संदीप वारे, राजू मोमीन, अभिमन्यू मोटे, भारत मोहोळ, चेतन पाटील व खेड पोलीस स्टेशनकडील पोलीस अंमलदार गोकुळ कोळी यांनी केली असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक महेश गरड, खेड पोलीस स्टेशन हे करत आहेत.

पुणे ग्रामीण पोलीस